International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भाई गणपतराव देशमुख यांचे सांगोला तालुक्यातील दुष्काळ व पाणी प्रश्नासंदर्भातील कार्य

**भोसले अर्चना महादेव[1], डॉ.सांळुखे उमेश अशोक[2]**

[1]*सारथी संशोधक, इतिहास विभाग, के.बी.पी महाविदयाल पंढरपूर (स्वायत्त)*

[2]*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, के.बी. पी.महाविदयाल, पंढरपूर (स्वायत्त)*

*Corresponding Author – भोसले अर्चना महादेव*

**DOI - 10.5281/zenodo.18709707**

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती ते आधुनिक महाराष्ट्राची उभारणी या प्रदीर्घ कालावधीमध्ये भार्ग गणपतराव देशमुख यांनी सांगोला तालुक्याचे सक्रिय नेतृत्व केले आहे. भाई गणपतराव देशमुख यांनी सांगोला तालुक्याचे 11 वेळा म्हणजेच 55 वर्ष आमदार म्हणुन प्रतिनिधित्व केले आहे. यावेळी अनेक प्रश्न, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये वंचिताना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केलेल्या दुष्काळ व पाणी प्रश्नासंदर्भातील कार्यामुळे सांगोला तालुक्याची प्रगती दिसते त्यामध्ये भाई गणपतराव देशमुख यांचे कार्य मोलाचे आहे.

**विषयाची निवड :**

सांगोला तालुका भौगोलिक दृष्टया अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि वारंवार पडणारा दुष्काळ यावर मात करण्यासाठी भाई गणपतराव देशमुख यांनी राबवलेली धोरणे, सिंचन योजना आणि लोकसहभाग यांचा या संशोधनात अभ्यास केला आहे.

**संशोधनाचे उदिष्टये :**

1. सांगोला तालुक्यातील दुष्काळाची भीशणता अभ्यासणे
2. भाई गणपतराव देशमुख यांचे सिंचन योजनेमधील योगदान अभ्यासणे
3. भाई गणपतराव देशमुख यांचे जलसंधारण व फलोत्पादन क्षेत्रातील भूमिकेचे विश्लेशण करणे
4. दुष्काळ निवारणासाठी त्यांनी केलेल्या विविध कार्याचा अभ्यास करणे .

**भाई गणतपरव देशमुख यांचे दुष्काळ व पाणी संदर्भातील कार्य :**

सांगोला तालुक्याच्या दुष्काळी व पाणी संदर्भातील त्यांनी केलेला संघर्ष महत्वपूर्ण आहे. त्यासाठी भाई गणपतराव देशमुख यांनी अनेक पाणी परिषादाचे आयोजन केले. सोलापूर जिल्हातील सांगोला तालुका हा कायम दुष्काळी तालुका म्हणुन ओळखला जातो. तालुक्यातील माण,कोरडा, बेलवण, आणि अप्रुका या चारही नदया व तालुक्यातील लहान – मोठे तलाव वर्षभर कोरडेच असतात. भीमा व कृष्णा नदीच्या पात्रापासुन सांगोला तालुक्याचा परिसर 150 ते 200 फूट उंचावर असल्याने इतर भागातील पाणी उचलून आणण्याशिवाय पर्याय नव्हता. योग्य नियोजनाच्या अभावामुळे ते पाणी समुद्राला वाहून जाते हे पाणी दुष्काळी भागाला व विशेषतः सांगोला तालुक्याला मिळावे यासाठी आमदार भाई गणपतराव देशमुख यांनी प्रयत्न केले.

सांगोला तालुक्याला दुष्काळी मुक्ती साठी व शेती, पिण्याच्या पाणी प्रश्नावर सन 1959 साली शेतकरी कामगार पक्षाने तत्कालीन खासदार कांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली संगोले' येथे पाणी परिषद आयोजिक करून या प्रश्नाला

प्रथमतः वाचा फोडली. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या 1975 च्या निर्णयानंतर सांगोला तालुक्यातील नागज येथे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतदादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली 13 ऑगस्ट 1977 रोजी पाणी परिषद घेतली गेली. या पाणी परिषदेचे भाई गणपतराव देशमुख हे स्वागताध्यक्ष होते. त्यावेळी हजारोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या पाणी परिषदेमध्ये कृष्णा पाणी वाटप लवादाच्या निर्णयानंतर महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या पाण्यापैकी 30 ते 40 टी.एम.सी. पाणी सांगोला, मंगळवेढा, जत, आटपाडी, कवठेमहाकांळ , मिरज, विटा, खानापूर तासगाव, इ.दुष्काळी तालुक्यांना उचलून देण्याचा विचार पहिल्यांदाच झाला. यामध्ये भाई गणपतराव देशमुख यांची भूमिका मोलाची होती.

यानंतर भाई गणपतराव देशमुख व थोर क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या सहकार्याने कृष्णा खोऱ्यातील तेरा दुष्काळी तालुक्यातील गावांमध्ये सभा, बैठका घेवून जनजागृती केली. 1984 साली स्व. वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना कृष्णा – कोयना म्हैसाळ – ताकारी सिंचन योजना सुरू केली. त्यानंतर हे काम अतिशय संथ गतीने सुरू होते. 30 जूलै 1995 रोजी सांगोला येथे पाणी परिषद घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे , पाटबंधारे मंत्री महादेवराव शिवणकर व ग्रामविकास मंत्री अण्णासाहेब डांगे उपस्थित होते. या पषिदेला 35 ते 40 हजार जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी झालेल्या भाषणात आमदार भाई गणपतराव देशमुख यांनी दुष्काळी भागातील जनतेचे प्रश्न मांडून टेंभू योजना व म्हैसाळ सहवाटप योजना ताबडतोब कार्यान्वित करण्याची मागणी केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे शासनाने लगेच दिनांक 11 ऑगस्ट 1995 रोजी टेंभू व म्हैसाळ योजनचे सर्व्हे करण्याचे आदेश दिले.

पाणी परिषदेच्या चळवळीमुळे दिनांक 1 नोव्हेंबर 1996 रोजी आटपाडी येथे महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळ रोखे विक्रीचा शुभारंभ झाला. त्यावेळी बोलताना मा. आमदार भाई गणपतराव देशमुख यीी सांगोला भागातील दुष्काळाचे जिवंत चित्र उभे केले व या प्रकल्पाचे काम एकाच वेळी सर्व ठिकाणी सुरू करण्याची मागणी केली. तत्कालीन मुख्यमंत्री ना. मनोहरपंत जोशी यांनी सर्व टप्प्यांमधील काम एकाच वेळी सुरू करण्याची घोषणा केली. 26 जूलै 1995 पासुन आजपर्यत दरवर्षी शेतमजूर, शेतकरी संघटनेच्या वतीने क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, मा.आमदार भाई गणपतराव देशमुख, भाई जगन्नाथराव लिगाडे, डॉ. बाबुराव गुरव, डॉ भारत पाटणकर व अन्य कार्यकर्त्यांनी पाणी परिषदा घेवून सातत्याने सांगालो तालुक्यातील पाण्याची चळवळ सातत्याने वाढवण्याचा प्रयत्न केला. व अनेक प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यात पाणी आणले आहे.

सांगोला तालुक्याला शेतीसाठी व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यामध्ये भाई गणपतराव देशमुख यांचे योगदान महत्वाचे आहे. सांगोला तालुक्यात दरवर्षी उन्हाळयामध्ये अनेक गावात व वाडयावस्त्यांवर पिण्याच्या पाण्याच टंचाई निर्माण होत होती. 26 जूलै 1995 रोजी महाराष्ट्र शासनाने राज्यातील ग्रामीण भागाचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पेयजल पाणी पुरवठा कार्यक्रमाची श्वेतपत्रिका सादर केली. श्वेतपत्रिका सादर केली. श्वतेपत्रिकेमध्ये दिलेल्या घोषणांच्या आधारे सोलापूर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने तालुका स्तरावरील तालुका समन्वय समिती व जिल्हा सुसूत्रीकरण समितीद्वारा कृती आराखडा तयार केला. सांगोला तालुक्याच्या कृती आराखडयात अनेक प्रकारच्या त्रुटी होत्या. शिरभावी, वासूद, कडलास, शिवणे, इ. 29 गावे दोन वेळा दाखविलेली होती. तर हणमंतगाव, नराळे, बुरूंगेवाडी या गावांना

उन्हाळयात टॅकरने पाणी पुरवठा करावा लागत होता. तरीही कृती आराखडयात य गावांचा समावेश नव्हता. अशा प्रकारच्या गंभीर चुका आमदार भाई देशमुख यांनी शासनाच्या निदर्शनास आणून देवून सांगोला तालुक्यासाठी भीमानदी उगम ठिकाण धरून नळपाणी पुरवठा योजना तयार करण्याची मागणी केली. त्यानुसार शासनाने सांगोला तालुक्यात 82 गावांसाठी भीमानदी उगमस्थान धरून 87 कोटी रूपयांची पिण्याची पाण्याची योजना मंजूर केली. त्याचप्रमाणे मा. आमदार भाई गणपतराव देशमुख यांनी भीमानदी उगम धरून फक्त सांगोला नगरपालिका हद्दीकरीता 100 टक्के अनुदानातून सुमारे 5.50 कोटी रूपये खर्चाची व 1.30 कोटी रूपयांची पाणी पुरवठा योजना पुर्ण केली. आज महाराष्ट्रात 'क' वर्ग नगरपालिकेमध्ये सांगोला नगरपालिकेची पाणी योजना सुस्थितीत चालू आहे.

1972 मध्ये राज्यामध्ये सर्वत्र दुष्काळ पडलेला होता. पाणी व अन्नधान्याची मोठया प्रमाणात कमतरता निर्माण झाली होती. शेतकरी, शेतमजूरांवर कामाअभावी उपासमारीची वेळ निर्माण झाली होती. त्यावेळी राज्य सरकारने यावर उपाय म्हणून 15 कलमी कार्यक्रम आखला, त्यामध्ये 'रोजगार हमी योजनेचा' समावेश केला व मागेल त्याला काम अशी घोषणा केली. या योजनेच्या निर्मितीमध्ये मा. आमदार भाई गणपतराव देशमुख यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. ही योजना कालांतराने केंद्र सरकाने स्वीकारली. ती योजना पूढे 'मनरेगा किंवा नरेगा ' या नावाने चालू आहे.

महाराष्ट्र शासनाने या योजनेची व्याप्ती वाढवून कृषी, जलसंधारण व अन्य विभागातील कामागसाठी रोजगार हमी योजनेद्वारे काम करण्यास सुरूवात केली. सन 1999 ते 2002 मध्ये भाई गणपतराव देशमुख पणन व रोजगार हमी योजना खात्याचे मंत्री असताना फळबाग लागवडीच्या कार्यक्रमाची जोड रोजगार हमी योजनेशी घालून राज्यामध्ये मोठया प्रमाणात फळबाग लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याद्वारे सांगोला तालुक्यात डाळींब, बोर, चिक्कू व अन्य फळबाग लागवडीच्या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आज सांगोला तालुका हा डाळिंब उत्पादनाच्या बाबतीत राज्यात अग्रेसर आहे. टेंभू व म्हैसाळ योजना सांगोला शाखा नं 5 चे पाणी सांगोला तालुक्यात आल्यामुळे कमी पाण्यावर आधारित फळबाग लागवड मोठया प्रमाणात करण्यात आली आहे.

**निष्कर्ष :**

भाई गणपतराव देशमुख यांनी दुष्काळाकडे केवळ आपत्ती म्हणुन न पाहता ती दूर करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न केले. तसेच सांगोला तालुक्यातील पाणी टंचाई निवारण्याचो त्याचे प्रयत्न राजकीय इच्छाशक्ती आणि शास्त्रीय नियोजनाच्या जोरावर दूष्काळी प्रदेशाचे नंदनवन करता येते हे दाखवून दिले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

1. संपादकः नानासाहेब लिगाडे, आठवणीतील भाई गणपतराव देशमुख, शब्द शिवार प्रकाशन
2. डॉ. कृष्णा इंगोले, भाई गणपतराव देशमुख व्यक्तिचित्रण शब्द शिवार प्रकाशन
3. डॉ. कृष्णा इंगोले, राजकारणातील आदर्श व्यक्तिमत्व : भाई गणपतराव देशमुख, शब्द शिवार प्रकाशन,
4. द इकॉनॉमिक टाईम्स, 19 ऑक्टोबर 2014,